# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**हिंगोली जिल्हा रुग्णालयाच्या इमारतींची बांधकामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(१) २६९२ (१५-०१-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा रुग्णालयातील १०० वाढीव खाटांच्या रुग्णालयाची इमारत तसेच इतर इमारतीची बांधकामे पूर्ण करण्याची मुदत संपल्यानंतरही अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची बांधकामे मुदत पूर्ण होऊनही अपूर्ण असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर इमारतीची अपूर्ण बांधकामे निश्चित किती कालावधीत पूर्ण करण्यात येतील ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

कंत्राटदाराने मंद गतीने काम करणे व रुग्णालयाच्या परिसरातील इतर कामे एकाच वेळेस सुरु असल्याने बांधकामाचे साहित्य ठेवण्यास येणाऱ्या अडचणी व बांधकामासाठी लागणाऱ्या वाळुची कमतरता यामुळे सदर इमारतींची बांधकामे पूर्ण न झाल्यामुळे विलंबाबाबत बांधकाम विभागाने कंत्राट दाराकडून रु.२,०१,१००/- दंड वसुल केला आहे. रुग्णांना उपलब्ध असलेल्या इमारतीमध्ये आरोग्य सेवा देण्यात आलेली आहे. रुग्णालयाच्या लिफ्टचे काम प्रगतीपथावर आहे. तळ मजल्यावरील वार्ड क्र. ३ व ४ चे नुतनी करणाचे काम सुरु असून सदर वार्डचे काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरीत तळ मजल्यावरील वार्ड टप्या टप्याने नुतनीकरण झालेल्या वार्डात स्थलांतरीत करुन तळ मजल्यावरील सर्व वार्डाचे काम पुर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**सांगलीतील शासकीय रूग्णालयाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२) १२०९८ (०६-०४-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील शासकीय रूग्णालयाची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सांगली येथील जिल्हा रुग्णालय व महिला व नवजात शिशु रुग्णालय या रुग्णालयांच्या अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**सफाळे परिसरातील (जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्ययावत सोयी-सुविधा नसल्याबाबत**

**(३) २२७९३ (१७-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (जि.पालघर) परिसरात एकूण ६९ गावे व ४६ पाडे मिळून तेथील लोकसंख्या २ लाखांच्यावर जाऊन पोहोचली असून दैनंदिन वाढत्या नागरीकीकरणामुळे दिवसागणीक लोकसंख्येत भर पडत असून त्याचा परिणाम आरोग्य विषयक मुलभूत सुविधांसह इतर सर्व सुविधांचा अभाव असून अपघातात फ्रॅक्चर झालेल्या रुग्णांचा एक्सरे काढून झाल्यावरच त्या दुखापतीचा अंदाज लावला जातो, तथापी सफाळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राज एक्सरेची सोय तसेच अद्ययावत ऑपरेशन थिएटर व अन्य सोयी-सुविधा नसल्यामुळे त्या रुग्णांवर केवळ प्राथमिक उपचार करुन त्यांना खाजगी रुग्णालयात पाठविण्याचा सल्ला प्राथमिक आरोग्य केंद्राकडून देण्यात येत असल्यामुळे तेथील नागरीकांनी मागील ३ वर्षापासून सातत्याने सुसज्ज व अत्याधुनिक रुग्णालय उभारण्यात यावे म्हणून मा.आरोग्य मंत्री, सचिव, आरोग्य विभाग, उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे, जिल्हाचिकीत्सक, सामान्य रुग्णालय, ठाणे आदींकडे लेखी निवेदनाद्वारे, प्रत्यक्ष भेटून, आंदोलने करुन मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास सफाळे येथे सुसज्ज व अद्ययावत सोयी-सुविधा असलेले रुग्णालय विनाविलंब उभारण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९)** :(१) व (२) अंशत: खरे आहे.

निकषानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी क्ष-किरण यंत्र व तत्रज्ञ मंजुर नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना प्राथमिक उपचार देऊन पुढील क्ष-किरण तपासणी व अत्यावश्यक उपचारासाठी शासकिय रुग्णालयात संदर्भित केले जाते.

नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून सफाळे (जि.पालघर) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंदगड व गडहिंग्लज तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ४५३६९ (११-०५-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड व गडहिंग्लज तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे बांधणेसाठी आवश्यक असलेल्या रुपये ३ कोटीची तरतूद जिल्हा वार्षिक योजनेत करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे मा.पालकमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंदगड तालुक्यातील कोवाड, बुगडीकट्टी, मजरेकार्वे येथील मंजूर असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र कोवाड, ता. चंदगड साठी सन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये रु.२.१९ कोटी व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये रु.३५.३२ लाख इतका निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झाला आहे. उपकेंद्र बुगडीकट्टी, ता. गडहिंग्लज साठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये रु.४२.०९ लाख व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये रु.१७.८८ लाख इतका निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेला आहे. उपकेंद्र मजरे कार्वे, ता. चंदगड साठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये रु.६१.६७ लाख व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये रु.२.९१ लाख इतका निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेला आहे. सदर संस्थांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देगलूरनाका (जि.नांदेड) परिसरातील हैदरबाग येथील**
**महानगरपालिकेचे रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(५) ४६९५० (१७-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील गुरु ता गद्दी त्रिशताब्दी सोहळयाच्या काळात महानगरपालिकेने उभारलेल्या हैदरबाग येथील रुग्णालय गेल्या पाच वर्षापासून वापराविना बंद अवस्थेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयाकरिता कोटयावधी रुपयांचा खर्च करुन बांधलेली इमारत राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडे सन २०१० मध्ये ५० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आले होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुरु ता गद्दी त्रिशताब्दी सोहळयाच्या काळात देश आणि विदेशातून लाखो भाविक नांदेडमध्ये दाखल होत असतांत त्यांच्या उपचारासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून महानगरपलिकेने शिवाजीनगर, सिडको, जंगमवाडी व हैदरबाग अशा चार ठिकाणी भव्य नविन रुग्णालये उभारली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर यापैकी हैदरबाग रुग्णालय सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(६) तदनुसार उक्त रुग्णालय तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हैदरबाग येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या इमारतीचा कागदोपत्री ताबा जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांच्या कार्यालयाकडे दि.१३.०७.२०१० रोजी देण्यात आलेला होता. परंतु, प्रत्यक्ष ताबा देण्यात आला नव्हता. सदर कागदोपत्री ताबा परत घेण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड यांच्या कार्यालयातर्फे महानगरपालिकेला विनंती करण्यात आलेली होती. प्रत्यक्षात सदर इमारत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे अद्याप हस्तांतरीत करण्यात आली नाही.

(३) हे खरे आहे.

(४) नांदेड वाघाला शहर महानगरपालिका नांदेड तर्फे दि.१८.०८.२०१७ पासुन सदर रुग्णालय कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) नांदेड वाघाला शहर महानगरपालिका तर्फे दि.१८.०८.२०१७ पासून सदर रुग्णालय कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

---

**किन्हीराजा (जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) ४९८११ (११-०५-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हीराजा (जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती सन २०१० मध्ये झाली परंतु या इमारतीचे बांधकाम मागील सहा वर्षापासून प्रलंबित असून जुन्या आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीत प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव संबंधित विभाग तसेच आसपासच्या परिसरातील नागरिकांना आवश्यक आरोग्य मिळण्यास अडचणी येत आहेत हे लक्षात घेता शासनाने आवश्यकती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

ऑक्टोबर २०१७ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र किन्हीराजा येथील नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून नवीन इमारतीमध्ये रूग्णालय सुरू आहे.

(२) सद्यस्थितीमध्ये तेथे बाह्यरूग्ण, आंतररूग्ण व इतर आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुसुंबा (ता.जि.धुळे) येथे ट्रामा सेंटर बांधण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(७) ५६०७१ (३०-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुसुंबा (ता.जि.धुळे) येथे ट्रॉमा सेंटर मंजूरी आहे परंतु जागा उपलब्ध नसल्याने ट्रामा सेंटर बांधण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्हयातील साक्री हे मध्यवर्ती ठिकाण असून तेथे जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणी ट्रामा सेंटर व्हावे अशी मागणी पुढे येत असल्याने त्याठिकाणी ट्रामा सेंटर करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे तालुक्यातील कुसुंबा येथे ट्रॉमा सेंटर मंजूर आहे. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात जागा उपलब्ध नसल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राला लागून असलेल्या जिल्हा परिषदेच्या बंद पडलेल्या मराठी शाळेच्या जागेची जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडे मागणी करण्यात आली होती. सदर जागेची संमती मिळाल्यानंतर मोजणी करून घेण्यात आली आहे. परंतु जागेचा मोजणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसल्याने पुढील कार्यवाही करता आलेली नाही. ट्रॉमा केअर सेंटर, कुसुंबाच्या मुख्य इमारत बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे,

(२) असा कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, ग्रामीण रूग्णालय, साक्री चे १०० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात आले असल्याने सद्य:स्थितीत तेथे जागा उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वैद्यकिय बिल भरु न शकणाऱ्या रुग्णाला डिस्चार्ज न देणे व मृतदेह रुग्णालय प्रशासनाचे ताब्यात ठेवणे प्रकरणाबाबत**

**(८) ५६८१२ (३०-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकिय बिल भरु न शकणाऱ्या रुग्णाला डिस्चार्ज न देणे तसेच मृतदेह रुग्णालय प्रशासनाचे ताब्यात ठेवणे अशा प्रकरणी सदर रुग्णालय प्रशासनावर कारवाईचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आत्तापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(९) ६०७१९ (३०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील माता मृत्यूचे प्रमाण कमी करणे तसेच नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरवणे याकरिता शासन प्रयत्नशील असतांनाही तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची वेळीच तपासणी केली जात नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थेट खाजगी रुग्णालयाकडे रुग्ण पाठवण्यात येत असल्याने जिल्हयातील ग्रामीण रुग्णालये फक्त नावालाच उरली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माता मृत्यूचे प्रमाण कमी व्हावे, नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळावी याकरिता कोट्यवधी रुपयांची यंत्रसामुग्री पुरवूनही त्याचा वापर होत नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी/अथवा पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तद्नुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

फक्त अतिजोखमीचे रुग्ण १०२ व १०८ या रुग्णवाहिकेद्वारे ग्रामीण रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय/सी.पी.आर येथे संदर्भित केले जातात.

(३) व (४) हे खरे नाही.

क्ष किरण, एचआयव्ही टेस्ट, व्हीडीआर एल, एचबी टेस्ट इत्यादी सर्व तपासण्या आरोग्य संस्थेतील उपलब्ध मशिनरी व साधन सामग्रीचा वापर करुन मोफत करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील आरोग्य अधिकारी कार्यालयाची इमारत धोकादायक असल्याबाबत

**(१०) ६८१४७ (१०-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील आरोग्य अधिकारी कार्यालयाची इमारत धोकादायक बनली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुर्वीच्या जुन्या नागरी दवाखान्यात सदर कार्यालय असुन पूर्ण इमारत गळत असुन स्लॅब कोसळण्याच्या मार्गावर आहे व पुर्ण भिंतींमध्ये पाणी तसेच काही प्रसंगी वीज उतरत असुन ३ आरोग्य उपकेंद्र तसेच १७ उपकेंद्राचा कारभार याच कार्यालयातून चालतो मात्र सदर कार्यालय असुरक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयास स्वतंत्र इमारत नसल्यामुळे सदर कार्यालय नागरी दवाखाना, भोकर येथील इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात चालू करण्यात आले आहे. तथापि, सदर नागरी दवाखान्याच्या इमारतीची दुरुस्ती करण्यात आली असल्याने इमारतीस कोणताही धोका नाही.
(३) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, भोकर या कार्यालयास पंचायत समिती, भोकर येथील इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माहूर (जि.नांदेड) येथील रेणूकादेवी तीर्थक्षेत्रस्थानी भाविकांच्या आरोग्याच्या सोईसाठी उपलब्ध करण्यात आलेली १०८ क्रमांकाची रुग्णवाहिकेची सेवा अपूरी पडत असल्याबाबत**

**(११) ७०६४८ (१०-०१-२०१७). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूर (जि.नांदेड) येथील साडेतीन पिठापैकी पूर्ण एक पीठ असलेले रेणूकादेवी तीर्थक्षेत्रस्थानी भाविकांच्या आरोग्याच्या सोईसाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेली १०८ क्रमांकाची रुग्णवाहिकेची सेवा भाविकांसाठी अपूरी पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आणखी एक जादा १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याची मागणी भाविकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरिक्त रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) असा प्रस्ताव प्राप्त नाही.
(३) व (४) माहुर येथे टोल फ्री क्र. १०८ ची एक रुग्णवाहिका कार्यान्वित असून अधिकच्या रुग्णवाहिकेची आवश्यकता भासल्यास नजिकच्या परिसरातील ३ रुग्णवाहिका आरोग्य सेवेस उपलब्ध होतात.

---

### अहमदपूर तालुक्यातील उप जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पावसाचे पाणी साचल्याबाबत

**(१२) ७२६७८ (१०-०१-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर तालुक्यातील उप जिल्हा रुग्णालय पावसाच्या पाण्याने ओसंडून भरल्याचे माहे जून-जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे बांधकाम निकृष्ठदर्जाचे असूनसुध्दा रुग्णालयाच्या ६ वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय अधीक्षकांचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

अहमदपूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात जास्त पाऊस झाल्यामुळे रुग्णालयाच्या आवारात काही काळ पाणी जमा झाले होते. तथापी, वैद्यकीय अधिक्षक यांच्या विनंतीनुसार नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी तुंबलेल्या नाल्याची साफसफाई करुन पाण्याचा निचरा तातडीने करुन दिला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शेवाळ (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(१३) ८००९० (१८-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवाळ (ता.कळमनुरी जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची अतिशय दुरवस्था झाल्यामुळे इमारत धोकादायक झाली असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयाच्या इमारतीची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच इमारतीच्या दुरुस्तीबाबत दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) उपकेंद्र शेवाळा, ता.कळमनुरी येथील इमारतीचे बांधकाम जुने असले तरी त्या ठिकाणी एक खाटेचे प्रसुतीगृह सन २००९-१० या वर्षामध्ये बांधण्यात आलेले आहे. तसेच एन.आर.एच.एम. अंतर्गत उपकेंद्र शेवाळा येथील इमारतीची दुरुस्ती करण्यात आलेली असून सदर दुरुस्तीवर रु.१.५६ लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे रुग्णांना आवश्यक त्या आरोग्य सेवा देण्यात येतात व रुग्णांची गैरसोय होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी कुटुंबांना सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेतंर्गत आर्थिक मदत व प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(१४) ८०४३९ (१९-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्त्रीभ्रृणहत्या रोखण्यासाठी तसेच मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शासनाने दिनांक १ एप्रिल, १९९५ पासून सुरू केलेल्या सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेतंर्गत गोंदिया जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी कुटुंबांना सन २०११-१२ ते २०१४-२०१५ या कालावधीतील एकूण ९९७ कुटुंबांना राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र अद्‌याप देण्यात आलेले नाही तसेच ८७१ कुटुंब आर्थिक मदतीपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दारिद्‌यरेषेखालील कुटुंबांची प्रलंबित आर्थिक मदत व प्रमाणपत्राबाबत संबंधित लेखा विभागाचे अधिकाऱ्यांना कारणे दाखवण्याबाबतची नोटीस देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्हयात सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेअंतर्गत सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीत एकूण १३५८ प्रकरणे लाभ देण्यास पात्र होती. यापैकी मार्च, २०१५ अखेर ११३१ लाभार्थ्यांना रु.२०००/- प्रमाणे धनादेशाद्‌वारे लाभ देण्यात आला होता व २८९ लाभार्थ्यांना बचत प्रमाणपत्र देण्यात आले होते.

(२) हे खरे आहे.

(३) या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याकडून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेल्या सखोल चौकशीच्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित ७ अधिकारी व कर्मचारी यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच एक आरोग्य सेवक तथा कार्यासन कर्मचारी यांना दि. १४.०२.२०१७ रोजी निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकिय रुग्णालयातील "आरोग्य साधना, सामग्री देखभाल व दुरुस्ती विभाग" बंद केल्याबाबत**

**(१५) ८७४०२ (२१-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोल्हापूर, ठाणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर व पुणे येथील शासकिय रुग्णालयातील अत्याधुनिक मशीन मध्ये बिघाड झाल्यास त्वरीत दुरुस्त करुन बिनाखंड सुरु रहाव्यात यासाठी शासनाने आरोग्य विभागाअंतर्गत सुरु केलेला "आरोग्य साधना, सामग्री देखभाल व दुरुस्ती विभाग" बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभाग बंद केल्यामुळे ७२ कर्मचारी बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, नादुरुस्त मशीन दुरुस्त करण्याची जबाबदारी शासनाने चेन्नई येथील सिंदुरी या कंपनीकडे सोपविला असून त्या कंपनीला तातडीने २६ कोटी रुपये मंजूर करुन तो निधी कंपनीच्या नावे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वितरीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकिय रुग्णालयातील मशीनरी दुरुस्त करण्यासाठी व स्पेअर पार्ट्स खरेदी करण्यासाठी यापूर्वी फक्त २५ लाख रुपये देण्यात येत असताना खाजगी कंपनीला या कामासाठी आता २६ कोटी रुपये देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

नोव्हेंबर-२०१६ मध्ये मे.फेबर सिंदुरी मॅनेजमेंट प्रा.लि. चैन्नई बरोबर करार केलेला आहे. कराराची वार्षिक किंमत २६,३४,९६,००० असून त्यांच्या कामकाजाप्रमाणे देयके अदा केली जातात.

(४) नोव्हेंबर, २०१६ पुर्वी आरोग्य संस्थांच्या मागणीनुसार आरोग्य साधन सामुग्री दुरुस्ती व देखभालसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत होते. नोव्हेंबर, २०१६ नंतर करार केलेल्या संस्थेस त्यांच्या कामकाजाप्रमाणे देयके अदा केली जातात.

---

**अपंग प्रमाणपत्र प्रत्येक तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयातून वितरीत करण्याबाबत**

**(१६) ८८४५८ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग प्रमाणपत्र प्रत्येक तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयातून वितरीत करावे असे आदेश माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान राज्याच्या अपंग कल्याण आयुक्तांनी सर्व उपजिल्हा रुग्णालयांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्तांच्या उक्त आदेशानुसार पुणे जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयामधे अपंगांना शासकीय सवलती मिळण्यासाठी ४०% अपंगत्व असलेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सुविधा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपंगांना प्रमाणपत्र मिळण्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था तालुका उपजिल्हा रुग्णालयातून केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) पुणे जिल्हा रूग्णालय औंध व ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे येथून दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळणेची सुविधा उपलब्ध आहे. तसेच उपजिल्हा रूग्णालयातून दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.
(३) उप जिल्हा रूग्णालय भोर, इंदापूर, बारामती, मंचर व दौंड येथे दिव्यांगत्व प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी अपंग कल्याण आयुक्त,पुणे यांचेकडून  कार्यवाही पूर्ण झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामध्ये सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१७) ९६१९१ (२७-१२-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक आरोग्य केंद्रांतर्गत ५ ते ६ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामध्ये रुग्णांना आवश्यक त्या मूलभूत सुविधांचा अभाव, ठिकठिकाणी कच-याचे साम्राज्य, वैद्यकिय अधिका-यांची रिक्त पदे अशा अनेक तक्रारी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आरोग्य विभागाकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये अशा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. कर्जत तालुक्यात ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असून त्यापैकी ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारती आहेत. व एका प्राथमिक आरोग्य केंद्राला जागा उपलब्ध नसल्याने उपकेंद्रांच्या इमारतीत कार्यरत आहे.

३८ उपकेंद्रा पैकी ३२ उपकेंद्रे स्वत:च्या इमारतीत कार्यरत असून, ६ उपकेंद्रे भाड्याच्या जागेत कार्यान्वित आहेत. सर्वप्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये दररोज स्वच्छता केली जाते. या शिवाय दर आठवडयाला स्वच्छता अभियान राबवले जाते.

६ प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी यांची १२ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयाची मुख्य इमारत व निवासस्थान बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ९७१२६ (२७-१२-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयाची मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे गेली दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली दोन वर्षापासून प्रशासकीय मान्यता प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयात प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

तथापि, खर्डी, ग्रामीण रुग्णालय करीता सादर केलेल्या अंदाजपत्रक व आराखडयानुसार इमारत बांधकामासाठीचा सविस्तर वास्तुमांडणी नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सादर करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयास कळविण्यात आले आहे.

(३) सदर इमारत बांधकामसाठीचा सविस्तर वास्तु मांडणी नकाशा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरोग्य विज्ञानपीठाच्या, आयुर्वेदाच्या पदवी अभ्यासक्रमातील वादग्रस्त पुसंवनविधी प्रकरण रद्द करण्याबाबत**

**(१९) ९९१७७ (२७-१२-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञानपीठाच्या आयुर्वेदाच्या पदवी अभ्यासक्रमाची पुसंवनविधी या प्रकरणात दिलेली पुत्र प्राप्तीची माहिती, हे पीसीपीएनडीटी या कायदयाचे उल्लंघन करणारी बाब असल्यामुळे, आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमातून रद्द करण्याबाबत वारंवार मागणी करुनही, नकार दिल्यामुळे थेट सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन या संस्थेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचा निर्णय, दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी, राज्य शासनाने घेतला, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या संदर्भात, शासनाने केंद्रीय संस्थेविरुध्द, गुन्हा दाखल केला आहे काय, त्यानुसार पोलीसांनी चौकशी करुन, अद्याप संस्थे विरुध्द कोणती कारवाई केली आहे,

(३) तसेच, सदरहू केंद्रीय संस्थेने, पुसंवनविधी प्रकरण, आयुर्वेद अभ्यासक्रमातून तत्काळ वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेच्या कार्यकारी समितीने प्रकरण अभ्यासक्रमातून वगळता येणार नाही असा निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयात जिल्हयाच्या ठिकाणी सामान्य रुग्णालयाची स्थापना करण्याबाबत**

**(२०) १०३५०४ (०६-०१-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ठाणे जिल्हयाचे विभाजन करुन नव्याने पालघर जिल्हयाची निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली चार वर्ष होऊन सुध्दा जिल्हयाच्या ठिकाणी सामान्य रुग्णालयाची स्थापना अद्यापी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्य रुग्णालय स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा सामान्य रुग्णालय, पालघरसाठी १० एकर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु जिल्हा रुग्णालय इमारत व निवासस्थाने बांधकाम करीता एकूण ३० एकर जागेची आवश्यकता असल्याने जिल्हा शल्य चिकित्सक व आयुक्त, आरोग्य सेवा यांच्या

कार्यालयाकडून व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई यांच्याकडे अधीकची जागा देण्याबाबत विनंती केली असून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात, विशेषतः ग्रामीण भागातील महिला 'सॅनिटरी नॅपकिन' चा वापर करित नसल्याबाबत**

**(२१) १०९२२८ (०१-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), अॅड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, विशेषतः ग्रामीण भागात ८० टक्क्याहून अधिक महिला 'सॅनिटरी नॅपकिन'च्या वापरापासून वंचित असल्याप्रकरणाची मा.उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेऊन 'सॅनिटरी नॅपकिन' च्या वापरच्या जागृकतेसाठी तसेच सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्याबाबत खुलासा करण्याचे मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनास दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य शासनाने राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना 'सॅनिटरी नॅपकिन'च्या वापराबाबत जागृती करण्यासाठी आणि 'सॅनिटरी नॅपकिन' च्या किंमतीत सवलत देण्याबाबत अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) तसेच, 'सॅनिटरी नॅपकिन' ची ग्रामीण भागामध्ये जागृती करणे आणि शासनाच्या या योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी जिल्हानिहाय स्तरावर समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकीनच्या वापराबाबत जागृती करुन सॅनिटरी नॅपकीन सवलतीच्या दरात देण्यात येतात.
(३) शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत, Promotion of Menstrual Hygiene Scheme अंतर्गत जिल्हास्तर समन्वय समिती कार्यरत असून सदरच्या योजनेचा दर तिमाही आढावा घेण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयास उप जिल्हा रुग्णालयाच्या दर्जा देण्याबाबत**

**(२२) १०९९६७ (३१-०३-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयात आवश्यक सोई-सुविधांची कमतरता असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने रुग्णालयास उप जिल्हा दर्जा देऊन सुसज्ज करण्याची मागणी होत असल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयास उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव सन २०१२ मध्ये पाठविण्यात आला असून आरोग्य खात्याची अद्याप मंजूरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून वाडा (जि.पालघर ) येथे जिल्हा रुग्णालय सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किन्हाळा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावाचे मंजुर काम सुरु करण्याबाबत**

**(२३) ११४०४१ (१०-०४-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हाळा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे सिंचन विभागामार्फत पाझर तलावाचे काम घेण्यात आले सदर कामाकरीता परीसरातील जमीन भुसंपादीत करण्यात आली परंतु निधी अभावी पाझर तलावाचे काम सुरु नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसंपादनाकरीता ७० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाझर तलावा करीता निधीची तरतुद करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०२-२०१९) :** (१) किन्हाळा हे गाव उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील नसुन यवतमाळ जिल्हयामध्ये असुन, तेथिल पाझर तलावाचे काम जमीन अद्याप उपलब्ध न झाल्याने सुरु करण्यात आलेले नाही.

(२) प्रश्न भाग १ मधील उत्तराच्या अनुषंगाने सदर जमीन खरेदीसाठी रु.८५.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे.

(३) व (४) प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आलेल्या जमीनीच्या सरळ खरेदी प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करुन जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडून दि. १८/०७/२०१८ नुसार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे तसेच दि. १९/०५/२०१८ व ३/११/२०१८ नुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प पांढरकवडा यांचेकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील सर्व रुग्णालयातील अग्निसुरक्षा यंत्रणांची तपासणी करण्याबाबत**

**(२४) ११७९२३ (२८-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व रुग्णालयातील अग्निसुरक्षा यंत्रणाची तपासणी करण्याचे आदेश माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार राज्यातील सर्वच रुग्णालयातील अग्निसुरक्षा यंत्रणा तपासणी करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

मात्र राज्यातील रुग्णालयांना नोंदणी देताना व नूतनीकरण करताना अग्नीसुरक्षा यंत्रणेबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र पाहून नोंदणी देण्यात येते.

(३) सर्व जिल्हा शल्य चिकित्सकांना Maharashtra Fire Preventioin & Life Safety Measures Act २००६ च्या तरतुदीनुसार मार्गदर्शक सूचना दि. २९.१२.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील आरोग्य केंद्रामध्ये असलेल्या गैरसोयीबाबत**

**(२५) ११८६७२ (२३-०७-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णाना प्राथमिक सुविधा मिळत नसल्याने रुग्णांना खाजगी दवाखान्यांमध्ये जावे लागते तसेच श्वानदंश, सर्पदंश लसीचा नेहमीचा तुटवडा असल्याने रुग्णांना बाहेरुन औषधे घ्यावी लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडहिंग्लज, चंदगड व आजरा या तीन तालुक्यामध्ये असलेल्या जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक (महिला व पुरुष) प्रयोगशाळा तंत्रज्ञ व परिचर यांची अनेक पदे रिक्त असून सदर रिक्त पदे तवरित भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांना विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागाच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या दवाखान्यांच्या पायाभूत सुविधांसाठी जिल्हा परिषद, आरोग्य विभागाने ३४ कोटी रुपयांची मागणी करुनही जिल्हा नियोजन समितीने केवळ ७ कोटी रुपये मंजूर केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे.

(२) हे खरे आहे.

पदभरतीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) जिल्हा नियोजन समितीने रु.७.६७ कोटी इतका निधी मंजूर केला आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगोले (जि.सोलापूर) येथे ट्रामा केअर युनिटची उभारणी करण्याबाबत**

**(२६) १२०४६९ (२५-०७-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ या महामार्गावर अपघाताचे प्रमाण जास्त असल्यामुळे अपघातामध्ये जखमी झालेल्या व्यक्तीवर उपचार करण्याची कोणतीही सेवा जवळपास उपलब्ध नसल्याने दिनांक १२ जून २०१५ रोजी राज्यशासनाने सांगोले येथे ट्रामा केअर युनिट मंजूर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासंबंधी स्थानिक लोकप्रतिनीधीनी दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी मा.आरोग्यमंत्री व मा.वित्त व नियोजन मंत्री यांना समक्ष भेटून पत्र देऊन सदरहू ट्रामा केअर युनिटच्या इमारतीचे काम त्वरित सुरु करण्यात यावे अशी मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ट्रामा केअर युनिट इमारतीच्या बांधकामाच्या निविदा काढून सदर इमारतीचे काम त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय सांगोला जि. सोलापूर येथे ट्रामा केअर युनिट शासन निर्णय दि. १७ जानेवारी, २०१३ अन्वये मंजूर केले आहे.

(३) सदर ट्रामा केअर युनिट बांधकामाच्या रुपये ४,३५,१२,५००/- इतक्या रक्कमेच्या अंदाज पत्रकास शासन निर्णय दिनांक १२ जून, २०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली असून सन २०१८-१९ मध्ये रुपये १००.०० लक्ष इतके अनुदान मंजूर केलेले आहे.

शासनाच्या धोरणानुसार सांगोले येथील ट्रामा केअर युनिटच्या इमारतीचे बांधकाम हरित संकल्पनेवर आधारित करण्याचे प्रस्तावित असल्याने सुधारित आराखडे व अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचेकडून प्राप्त करुन सादर करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयास तसेच अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरेड (जि.नागपूर) तालुक्यात विवाह नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला विलंब.**

**(२७) १२०६२६ (२८-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शहरात नोकरीला गेलेल्या युवकांना मागील दोन वर्षापासून ग्रामिण रुग्णालय विवाह प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अधिकारी विलंब करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हयातील उमरेड, नगर परिषद अंतर्गत असलेल्या ग्रामिण रुग्णालयामध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्र मागील दोन वर्षापासून मिळत नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य अधिकारी, नगर परिषद, उमरेड व वैद्यकीय अधिक्षक यांच्या निष्ळकाजीपणामूळे सदर प्रमाणपत्र निर्गमित करण्यास विलंब होत आहे,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विवाह प्रमाणपत्र देण्यासंदर्भात विलंब करणा-या अधिकाऱ्यांवर शासनाने जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पानगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रास रुग्णवाहिका मंजूर करणेबाबत**

**(२८) १२१३६२ (०१-०८-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पानगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रास रुग्णाच्या सेवेसाठी १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकाप्रतीनिधिनी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री महोदयाकडे व सातत्याने अनेकवेळा जिल्हाधिकारी लातूर, उप संचालक, आरोग्य सेवा, लातूर यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर जिल्ह्यात तालुकानिहाय १०८ नंबरच्या किती रुग्णवाहिका असून त्यानुषंगाने रेणापूर तालुक्यात किती रुग्ण वाहिका नियमानुसार व निकषानुसार असणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) जिल्हा लातूर येथे ता.रेनापूर, ता.देवणी, ता.चाकूर, ता.जळकोट, ता.उद्‌गीर व ता.शिरुर अनंतपाळ येथे प्रत्येकी एक, ता.अहमदपुर येथे अहमदपुर व किनगाव येथे प्रत्येकी एक, ता.निलंगा येथे निलंगा, शिर्सी, मदनसूरी व निटूर येथे प्रत्येकी एक, ता.औसा येथे किल्लारी, लामजणा, औसा व बेलकुंड येथे प्रत्येकी एक व ता. लातूर येथे बभुळगाव व मुरुड येथे प्रत्येकी एक व लातूर येथे दोन अशा १०८ नंबरच्या एकूण वीस रुग्ण वाहिका उपलब्ध आहेत. सद्या तालुका रेनापूर येथे एक रुग्णवाहिका नियमानुसार व निकषानुसार योग्य आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या महिलेची झालेली फसवणूक**

**(२९) १२१४७६ (०१-०८-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा रुग्णालयात (जि.बीड) प्रसुतीसाठी आलेल्या महिलेने मुलाला जन्म दिला मात्र बाळाचे वजन कमी आहे या कारणास्तव त्यास जिल्हा रुग्णालयातील काचेच्या पेटीत ठेवण्यात आले परंतु दहा दिवसानंतर या महिलेला मुला ऐवजी मुलगी देण्यात आल्याची घटना माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी पिडीत दाम्पत्याने संबंधित पोलिस ठाण्यात याप्रकाराबाबत तक्रार केली आहे काय,हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार पिडीत दाम्पत्यास न्याय मिळण्यासह या प्रकरणात दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) होय.
(४) जिल्हा रुग्णालय, बीड येथील कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी मुलगी जन्मली असता रेकॉर्डवर मुलगा असल्याची चुकीची नोंद केल्याबाबत संबंधित वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे व इतर दोन जबाबदार कंत्राटी अधिकाऱ्यांच्या सेवा संमाप्त करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हापरिषदेंतर्गत येणाऱ्या तालुक्यातील आरोग्य कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(३०) १२२०७२ (२३-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या आठ तालुक्यातील आरोग्य कर्मचारी मागील चार महिन्यापासून वेतनापासून वंचित असल्याची बाब दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर कर्मचा-यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
पालघर जिल्हा परिषदेंतर्गत येणा-या आठ तालुक्यातील आरोग्य कर्मचारी यांचे पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्याने तीन महीन्याचे वेतन थकित होते.

(३) माहे एप्रिल २०१८ अखेर अनुदान प्राप्त झाल्याने सदर वेतन देयके अदा करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील संगमेश्वर ग्रामीण रुग्णालयाच्या (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) इमारतीची झालेली दुरावस्था**

**(३१) १२३१९७ (२३-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील संगमेश्वर ग्रामीण रुग्णालयाच्या (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) इमारतीची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे शवविच्छेदन कक्षही नादुरुस्त असून त्याचे नुतनीकरण करणेही आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्गावरील अपघातातील जखमींना तात्काळ उपचार मिळणेकरीता अत्यंत महत्वाचे असणारे सदरच्या ग्रामीण रुग्णालयाची देखभाल-दुरुस्ती व नुतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
सदर रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग रत्नागिरी यांना कळविले असून याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय, जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालय, रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रात असलेली रिक्त पदे**

**(३२) १२३२१५ (२५-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र इ. ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सक, स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, अस्थिव्यंग तज्ञ, चर्मरोग तज्ञ, मनोविकृती तज्ञ, क्षयरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ इ. महत्वाची वैद्यकीय अधिकारी व अन्य अधिकारी-कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी यांचेवर कामाचा अतिरिक्त  ताण पडत असल्याने वैद्यकीय सेवेत विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा,गट-अ ग्रेडपे ६६०० मध्ये एकुण ३० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७ पदे भरलेली आहेत. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ ग्रेडपे ५४०० मध्ये एकूण ९३ पदे मंजूर आहे. त्यापैकी ६८ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हा शल्य चिकित्सक तसेच विशेषज्ञ संवर्गातील सरळसेवेच्या तसेच पदोन्नतीच्या वाट्याची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड-पे रु. ५४००) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता दि. ८.११.२०१७ रोजी जिल्हाधिकारी यांना पदे भरण्याबाबत निर्देश दिलेले आहे. तसेच राज्यस्तरावर वैद्यकीय अधिका:यांच्या एकूण ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि.१३.०७.२०१८ रोजी प्रसिद्ध केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहारा (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील मंजूर सिंचन तलावास भुसंपादन करिता निधी मिळण्याबाबत**

**(३३) १२४१६६ (२३-०७-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील आदिवासी विभागामार्फत आदिवासी भागामध्ये तलाव मंजुर झाला आहे.परंतु सदर तलावा करिता लागणा-या जमीनाचे भुसंपादन न झाल्याने मंजूर तलावाचे काम करण्यात आले नसल्याचे दिनांक १२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समिती मार्फत भुसंपादना करिता निधी ची तरतुद करण्यात येते परंतु मंजुर कामाला दोन वर्ष होऊन कुठल्याही प्रकारची निधीची तरतुद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंजुर तलाव पुर्ण होण्यासाठी भुसंपादन करिता निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे काय, असल्यास, कधी पर्यंत निधी उपलब्ध करुन  देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास विलंबांची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आलेल्या जमीनीच्या सरळ खरेदी करिता जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडून दि. २८/३/१८ व २६/७/१८ नुसार जिल्हाधिकारी (नियोजन), यवतमाळ यांचेकडे तसेच दि. ३/११/२०१८ नुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प पांढरकवडा यांचेकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील नर्सिंग होम आणि रुग्णालयांनी वैद्यकिय नियमांचे उल्लंघन केल्याबाबत.**

**(३४) १२६४४८ (११-१२-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६७४२ नर्सिंग होम आणि रुग्णालयांनी सर्वसामान्य रुग्णांचे हित न बघता वैद्यकिय नियमांचे उल्लंघन केल्याची बाब शासनाने केलेल्या कारवाईतून माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भधारणापुर्व व प्रसवपूर्व निदान प्रतिबंधक कायदा (पीसीपीएनडीटी) व सुरक्षित गर्भपात कायद्याचे उल्ल्घन, वैद्यकिय जैवकचऱ्यांची योग्य विल्हेवाट न लावणे, बोगस डॉक्टरांची नियुक्ती, अग्निशमन यंत्रणा नसणे आदींप्रकरणी राज्यभरातील चाळीस नर्सिंग होमवर गुन्हा दाखल करण्यात आला असून १९६ नर्सिंग होमवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून १५६ नर्सिंग होमना कायमचे बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील तब्बल ८१६ नर्सिंग होम ही अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले असून ७५ नर्सिंग होमनी वैद्यकिय नियमांचे उल्लंघन केल्यामुळे त्यातील ५ नर्सिंग होमविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, अनधिकृत व नियमांचा भंग करणाऱ्या नर्सिंग होमवर कारवाई करण्यासह माफक दरात आरोग्य सुविधा मिळावी तसेच नियमांचे व आरोग्य सबंधित कायदयाचे काटेकारपणे पालन व्हावे यासाठी सातत्यातने नर्सिंग होमची पाहाणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

त्रुटी आढळलेल्या ६,७४२ रुग्णालयांपैकी ज्या रुग्णालयांनी त्रुटींची पुर्तता केली नाही अशा ४३४ रुग्णालय/नर्सिंग होम्सपैकी १९६ नर्सिंग होमवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असुन १५७ रुग्णालये/नर्सिंग होम्स कायमचे बंद करण्यात आले आहेत. ४३ डॉक्टर विरुध्द FIR दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

मुंबईतील ३८ नर्सिंग होम्स अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी २८ नर्सिंग होम्सवर गुन्हा दाखल करण्यात आला असुन १० नर्सिंग होम्सना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) राज्यात दिनांक १५.०३.२०१७ ते ३१.०५.२०१७ या कालावधीत सर्व खाजगी रुग्णालये/ नर्सिंग होम्सची धडक तपासणी मोहिम राबविण्यात आली आहे. मुंबई शुश्रुषा नोंदणी अधिनियम २००६ नुसार नोंदणी/पुर्ननोंदणी करताना रुग्णालयाची तपासणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील नामांकित रुग्णालयाने आरोग्य योजने अंतर्गत असलेल्या रुग्णास जास्त बिल आकारल्याबाबत**

**(३५) १२६९९६ (११-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील एका नामांकित रुग्णालयाने शासनाच्या आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या एका रुग्णास जास्त बिल आकारले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णाच्या तक्रारी नंतर सदर रुग्णालयाकडून अजूनही बऱ्याच रुग्णांकडून आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या रुग्णाकडून शुल्क आकारले असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब रुग्णांसाठी अल्पदरात उपचार करण्याचे योजना लागू असताना गरीब रुग्णाकडून किरकोळ आजारासाठी विविध तपासणी करण्याच्या नावाखाली रुग्णांची फसवणूक केली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, त्यानुसार आरोग्य योजनेंतर्गत गरीब रुग्णांना सदर योजनेचा लाभ न देणाऱ्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) नवी मुंबईतील डी.वाय.पाटील रूग्णालयात माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये अतिरिक्त रक्कमेची मागणी केल्याच्या एकूण ५३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या सर्व तक्रारीचे निराकरण राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून करण्यात आले असून रूग्णांना अतिरिक्त रक्कम परत देण्यात आलेली आहे.

वाशी नवी मुंबई मधील एम.जी.एम रूग्णालयाचे ऑगस्ट, २०१८ मध्ये २० तक्रारी सोसायटीस प्राप्त झाल्या असून त्यापैकी ९ तक्रारी अतिरिक्त रक्कम घेतल्याबाबत आहेत.

या तक्रारीपैकी ३ तक्रारीचे निवारण सोसायटीकडून करण्यात आले असून उर्वरित तक्रारींचे निवारण सोसायटीकडून करण्यात येत आहे.

(२) व (३) डी.वाय.पाटील रूग्णालयाची माहे सप्टेंबर ते डिसेंबर २०१८ पर्यंत ३ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या ३ तक्रारींचे राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून निवारण करण्यात आले आहे.

एम.जी.एम. रूग्णालयाची माहे सप्टेंबर, २०१८ ते डिसेंबर २०१८ अखेर ७ तक्रारी राज्य आरोग्य हमी सोसायटीस प्राप्त झाल्या असून त्या निवारण करण्याची कार्यवाही सोसायटीकडून करण्यात येत आहे.

(४) इन्शुरन्स कंपनी व राज्य आरोग्य हमी सोसायटी ने तक्रारीची चौकशी केल्यावर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले असून वरील सर्व तक्रारींचे निराकरण सोसायटीमार्फत करण्यात आले आहे.

(५) आरोग्य योजनेचा लाभ न देणाऱ्या अंगीकृत रूग्णालयांवार निलंबनाची अथवा अंगीकरण रद्द करण्याची कार्यवाही राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून करण्यात येते. आतापर्यंत ९८ रूग्णालये निलंबित तर २४८ रूग्णालयांचे अंगीकरण रद्द करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात औषधांचा साठा कमी असल्याबाबत.**

**(३६) १२७२७० (११-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात केवळ १५ दिवस पुरतील इतकाच औषधांचा साठा शिल्लक असल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषध खरेदीसंदर्भात तातडीने निविदा प्रक्रिया राबवून रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) धुळे जिल्हयातील आरोग्य केंद्रांकरिता अनुक्रमे रु.४१.०० लक्ष व रु.२०.५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीतून तातडीने निविदा प्रक्रिया राबवून रुग्णांकरिता औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले, त्यानुसार धुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत.

तसेच हाफकीन महामंडळाकडून देखील धुळे जिल्हा परिषदेकरिता मोठया प्रमाणात औषधी साठा पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत औषधांचा तुटवडा नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनानची "प्रधानमंत्री जनआरोग्य आयुष्यमान भारत योजना" राज्यातील जिल्हा शासकीय रुग्णलायात प्रायोगिक तत्वावर सुरु करण्याबाबत**

**(३७) १२७६८१ (११-१२-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाची “प्रधानमंत्री जनआरोग्य आयुष्यमान भारत योजना” सर्व राज्यातील जिल्हा शासकीय रुग्णालायात प्रायोगिक तत्वावर दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील किती कुटुंबांची नोंद करण्यात आली आहे,
(३) असल्यास, या योजनेचा लाभ कोणकोणत्या स्तरातील नागरिकांना मिळणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) होय. केंद्र शासनाची आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महाराष्ट्रात दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासुन पहिल्या टप्प्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसह राज्यातील अंगीकृत शासकीय रुग्णालयामध्ये एकत्रितपणे राबविण्यात येत आहे.
(२) आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतंर्गत कोल्हापुर जिल्हयात ग्रामीण भागात १३९११९ कुटुंबे व शहरी भागात ६५२२९ कुटुंबे अशा एकुण २०४३४८ इतक्या कुटुंबांची नोंद करण्यात आली आहे.
(३) सामाजिक, आर्थिक व जात निहाय जनगणना (SECC) २०११ मध्ये नोंदित समाविष्ट कुटुंबाना प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर येथील शेंडा पार्क येथे स्वतंत्र महिला रुग्णालय उभारण्याबाबतचा प्रस्ताव**

**(३८) १२७६९८ (१०-१२-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील शेंडा पार्क येथे नविन जिल्हा रुग्णालयाच्या जोडीला १०० खाटांचे स्वतंत्र महिला रुग्णालय उभारण्याबाबतचा प्रस्ताव छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (सीपीआर) प्रशासनाने संबंधित विभागाकडे सादर करुनही अदयाप सदर रुग्णालयाकरिता जागा मंजूरीसाठी लागणाऱ्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात रोज कोल्हापूर जिल्हयासह कोकण व कर्नाटकातून हजारो रुग्ण उपचाराकरिता येत असल्याने तेथील आरोग्य यंत्रणेवर ताण पडत असल्याने अनेक वेळा रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर शहरातच शेंडा पार्क येथे नविन जिल्हा रुग्णालयाच्या जोडीला १०० खाटांचे स्वतंत्र महिला रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

---

**नागपूर येथील मेयो मेडीकल सुपरस्पेशालिटी रुग्णालयात गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी केलेल्या रक्तदाब तपासण्या**

**(३९) १२७८६७ (१०-१२-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मेयो मेडीकल सुपरस्पेशालिटी रुग्णालयात गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसाठी एका तासात ७२० रुग्णांच्या रक्तदाब तपासण्यात करण्यात आल्या असल्याचा दावा दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका तासात ६० मिनीटे याप्रमाणे १ मिनीटात ४ रुग्णांचे रक्तदाब तपासण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय शास्त्राप्रमाणे एका मिनीटात चार रुग्णांचे रक्तदाब तपासणे प्रत्यक्षपणे शक्य नसल्याने याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार याप्रकरणामध्ये दोषी असणा-या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आाहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०३-२०१९) :** (१) नागपूर येथील मेयो, मेडिकल व सुपरस्पेशालिटी या तीन रुग्णालयांकडून एकूण ५८४ रुग्णांचे रक्तदाब तपासणी करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) लागू नाही.

---

**कागल (जि.कोल्हापूर) व नागपूर जिल्हयात' "स्क्रब टायफस" आजारांचे रुग्ण आढळल्याबाबत**

**(४०) १२८१२३ (११-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल (जि.कोल्हापूर) व नागपूर जिल्हयात काही मोजक्या देशात आढळून येणारा "स्क्रब टायफस" नावाचा आजारांचे रुग्ण माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजाराची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, या आजाराची लक्षणे काय असून खबरदारी म्हणून शासनाने कोणती उपायजोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) होय.

(२) स्क्रब टायफस आजाराचे राज्यभरात सन २०१८ मध्ये १७ डिसे.२०१८ अखेर ३९८ रुग्ण आढळुन आले.त्यापैकी ३६ जणांचा या आजारामुळे मृत्यू झाला आहे.

(३) स्क्रब टायफसच्या रुग्णास ज्या ठिकाणी किटक चावला असेल त्या जागी छोटास अल्सर तयार होतो त्यास इशार असे म्हणतात. या आजाराच्या सर्वसाधारण रुग्णांमध्ये ताप येणे, डोकेदुखी, अंगदुखी, लिंफ नोड सुजणे, कोरडा खोकला, अंगावर रॅश येणे अशी लक्षणे आढळतात. तर, गंभीर स्वरुपाच्या रुग्णांमध्ये न्यूमोनिया, मेंदूज्वर सदृष्य लक्षणे आढळतात. सदर आजाराच्या उपाययोजनेसाठी सर्वेक्षण, निदान, उपचार, प्रशिक्षण व आरोग्य शिक्षण या पंचसुत्री कार्यक्रमासोबतच किटक नियंत्रण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तामसा, आष्टी, वायपना (जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा पुरवठा बंद झाल्याबाबत**

**(४१) १२८४०९ (११-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सत्तर ते ऐंशी हजार लोकसंख्या असलेले तामसा, आष्टी, वायपना (जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत शाळा तपासणी, अंगणवाडी तपासणी, रोजची रुग्ण तपासणी व लसीकरण यासाठी हजारो रुग्ण येत असुन रुग्णांना देण्यासाठी आरोग्य विभागामार्फत दिला जाणारा औषधाचा पुरवठा मागील सहा महिन्यांपासून बंद असल्याचे दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी उक्त भागातील सरकारी दवाखान्यांना नियमित औषधी पुरवठा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) शासन पत्र दिनांक १९.५.२०१८ व १७.९.२०१८ अन्वये जिल्हा वार्षिक योजनांतर्गत प्राप्त निधीतून १० टक्के ते २० टक्के निधी स्थानिक स्तरावर औषध खरेदीसाठी खर्च करण्यास परवानगी दिली आहे.

तसेच उपलब्ध निधीतून गरजेनुसार औषधी खरेदी करुन प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वितरीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कराड (जि.सातारा) तालुक्यातील किवळ-खोडजाईवाडी लघु पाटबंधारे तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(४२) १२८४१२ (०५-१२-२०१८). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील किवळ-खोडजाईवाडी येथे लघु पाटबंधारे तलाव बांधण्यासाठी किवळ व खोडजाईवाडी येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तलावाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून त्यात पाणी साठा होत असूनही तलावासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या त्यांना वारंवार मागणी करुनही अद्यापी मोबदला देण्यात आलेला नसल्याने भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना त्याचा मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
ल.पा. योजनेसाठी खोडजाईवाडी येथील शेतकऱ्यांची जमीन संपादीत करण्यात आलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

दिनांक ४/६/२०१८ रोजी ग्रामपंचायत खोडजाईवाडी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केलेले आहे.

(३) व (४) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, पुणे यांनी दिनांक २०/०३/२०१८ रोजी या कामाच्या भूसंपादन अंतिम निवाडयाकरीता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे रु.६४१.७४ लक्ष इतक्या निधीची मागणी सादर केलेली आहे. तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सातारा यांचे दिनांक १८/१/२०१९ च्या पत्रानुसार या रक्कमेची पुन्हा महामंडळाकडे मागणी केलेली आहे. भूसंपादनाची रक्कम अदा करण्याकरीता रुपये २.०० कोटी इतक्या रक्कमेचा धनादेश उपलब्ध करण्यात आला आहे व उर्वरित रक्कम लवकरच उपलब्ध करण्यात येत आहे. भुसंपादनासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद द्वितीय सु.प्र.मा. अंदाजपत्रकामध्ये करण्यात येऊन त्यास दिनांक ६/९/२०१८ रोजीच्या महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. भूसंपादनाकरीता महामंडळाकडे निधी प्राप्त होताच शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सध्या रुपये २.०० कोटी इतकी रक्कम देण्यात आली असून उर्वरित रक्कम लवकरच उपलब्ध करण्यात येणार आहे.

---

## राज्यात दुसऱ्या आरोग्य संचालकाची नियुक्ती करण्यास होत असलेला विलंब.

**(४३) १२९३६२ (१०-१२-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.वारीस पठाण (भायखळा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य सेवेची गती वाढविण्याबरोबरच प्रशासकीय कारभार प्रभावी करण्यासाठी २ आरोग्य संचालक असावेत असा निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला असतानाही आजमितीस दुसऱ्या संचालकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या आरोग्य विभागाचे कामकाज सेंट जॉर्ज रुग्णालयातील आरोग्य संचालनालयातून चालविण्यात येत असून तेथे सहसंचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक तसेच सहायक संचालकाची अनेक पदे रिक्त असल्याने आरोग्य विभागाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात २ आरोग्य संचालक असावेत असा निर्णय घेण्यात आलेला असतानाही दुसरे संचालक पद न भरण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यात दुसरे आरोग्य संचालनालकाचे पद तसेच आरोग्य संचालनालयातील सद्यस्थितीत असलेल्या सर्व रिक्त पदे विनाविलंब भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

आरोग्य विभागातील सहसंचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक तसेच सहायक संचालकांची पदे श्रेणीअवनत करुन भरण्यात आली आहेत.

(३) संचालकाच्या दोन पदापैकी एक पद नामनिर्देशनाने भरण्यात आले आहे. व दुसरे पद पदोन्नतीने भरण्यासाठीची प्रक्रिया प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने करण्यात येत आहे.

(४) आरोग्य सेवा संचालनालयातील अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उपसंचालक ही पदे पदोन्नतीने भरण्यासाठीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडून अद्ययावत गोपनीय अहवाल व इतर माहिती मागविण्यात आली आहे. त्यानुसार संचालनालयाकडून माहिती मागविण्यात आली आहे. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ पदावर पदोन्नतीसाठीचा प्रस्तावही संचालनालयाकडून मागविण्यात आला आहे. व महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील नामनिर्देशनाची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून ३ वर्षासाठी (दि. ३०.९.२०२१ पर्यंत) वगळून ती निवडमंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी रुग्णालयात आकारण्यात येणा-या बिलावर नियंत्रण ठेवण्याच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(४४) १३०३२९ (११-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी रुग्णालयात दाखल झाल्यानंतर उपचाराचे बिल भरता न येणाऱ्या रुग्णांची रुग्णालयाकडून अडवणूक केली जात असल्याने अशा रुग्णालयावर नियंत्रण ठेवण्याबाबत राज्य शासनाने उपाययोजना करण्याच्या सूचना न्यायालयाने राज्य शासनास दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने न्यायालयाच्या सूचनेनुसार खासगी रुग्णालयावर नियंत्रण ठेवणारा कायदा करणार असल्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कायद्याचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) वैद्यकीय आस्थापना विधेयक-२०१४ चा मसूदा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून सदर विधेयक राज्यात लागू करण्यापूर्वी विधेयकातील तरतूदींवर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांचे स्पष्ट अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीत खाजगी रुग्णालयाचे प्रतिनिधी, भारतीय वैद्यकीय संघटनेचे प्रतिनिधी, आयएमएचे प्रतिनिधी, पॅथॉलॉजिकल लॅबचे प्रतिनिधी इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. सदर समितीने विधेयकांचा अंतिम मसूदा शासनास सादर केला आहे. त्याची छाननी करुन विधेयक सादर करण्यासाठी विहित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय.

**(४५) १३१४५९ (१०-१२-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात रुणसेवा विस्कळीत झाल्याने रुग्णांना डॉक्टरांसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याचे दिनांक ३ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे येणा-या गोरगरीब रुग्णांना औषधे व अन्य वैद्यकीय साहित्य बाहेरुन विकत आणावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार रुग्णांना तत्काळ व चांगली सेवा-सुविधा देण्यासह आवश्यक औषधे व वैद्यकीय साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये गोरगरिब व इतर पिवळे रेशन कार्ड धारक रुग्णांना तात्काळ औषधे व साहित्य उपलब्ध करुन दिले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (खरेदी कक्ष), मुंबई मार्फत औषधांचा व शस्त्रक्रिया उपकरणांचा पुरवठा करण्यात येत आहे. गोरगरिब रुग्णांसाठी उदा. पिवळे रेशन कार्ड धारक व अंत्योदय योजनेतील रुग्णांकरिता तात्काळ औषधे व इतर उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहाय्यक अधीक्षक, आरोग्य सेवा, लातूर यांच्या बदली संदर्भात**

**(४६) १३२०३२ (११-१२-२०१८). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उप संचालक कार्यालय आरोग्य सेवा, लातूर येथे सहाय्यक अधीक्षक पदावर कार्यरत असलेले श्री.पदमाकर चिमणराव धोंडदेव त्यांचे वडील श्री.चिमणराव उर्फ बाबुराव किशनराव धोंडदेव हे स्वातंत्र सैनिक वय वर्ष ९८ असुन ते मेंदूच्या विकाराने त्रस्त असल्यामुळे त्यांची उदगीर येथे झालेली बदली रद्द करून त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्याबाबतचे पत्र लातूर जिल्ह्याचे मा.पालकमंत्री व कौशल्य विकास उद्योजकता व माजी सैनिक कल्याणमंत्री यांनी मा.आरोग्य मंत्री व संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पदमाकर चिमणराव धोंडदेव यांची बदली रद्द करून त्यांना लातूर येथेच एक वर्षाची मुदतवाढ देण्याकरिता आरोग्यमंत्री यांनी संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांना आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उप संचालक, आरोग्य सेवा, लातूर यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांना श्री.पदमाकर चिमणराव धोंडदेव यांच्या बदलीमध्ये अंशतः बदल करून अथवा बदली रद्द करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उप संचालक यांनी सदर प्रस्तावावर श्री.पदमाकर चिमणराव धोंडदेव व श्री.राहूल मधुकरराव जाधव या दोघांच्याही बदल्या रद्द करण्याचा प्रस्ताव पाठवला असुन श्री.राहूल मधुकरराव जाधव यांची बदली रद्द करून त्यांना त्याच जागेवर कार्यरत ठेवण्यात आले व श्री.पदमाकर चिमणराव धोंडदेव यांना मा.आरोग्य मंत्री यांनी त्यांची बदली रद्द करून मुदतवाढ करण्याकरिता सूचना देऊनही त्यांना कार्यमुक्त करण्यात आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, ९८ वर्षाच्या स्वातंत्र सैनिकाने त्यांच्या आजारपणात त्यांच्या मुलाची बदली रद्द करण्यास केलेली विनंती व मंत्री महोदयांनी दिलेले आदेश याकडे संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी केलेल्या दुर्लक्षाबाबत शासनाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

संबधित दोन्ही कर्मचाऱ्यांचा मुख्यालयातील प्राशासकिय कालावधी पूर्ण झाल्याने दोन्ही कर्मचाऱ्यांची समुपदेशनाने प्रशासकिय कारणास्तव बदली करण्यात आलेली आहे.

तसेच संबंधितांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. तथापि, उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर यांनी त्यांचे स्तरावर पत्र जा.क्र उसंआसे/काय.अ./कार्यमुक्ती स्थगिती/श्री.धोंडदेव/ २०८८८-९३/१८, दि.०२.०८.२०८ अन्वये कार्यमुक्ती आदेशास स्थगिती दिलेली होती.उपसंआसे लातूर यांनी बदली रद्द करुन मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव या संचालनालयास सदर बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्याने नागरी सेवा मंडळाने मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव अमान्य केला आहे.

(५) प्रस्तुत प्रकरणी संचालनालयाने नियमानुसार कार्यवाही केली असल्याने प्रश्न उध्दभवत नाही.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हा रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत श्रवणयंत्राचे वाटप करण्यात आले नसल्याबाबत

**(४७) १३२०७१ (११-१२-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत १०० पेक्षा जास्त रुग्णांनी मागणी करुनसुध्दा श्रवणयंत्राचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब तसेच गरजू रुग्णांना श्रवणयंत्राची तात्काळ वाटप करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्हा रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत गरीब व गरजू रुग्णांना श्रवणयंत्राचे तातडीने वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०१९) :** (१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उस्मानाबाद जिल्हा रूग्णालयात काही रूग्णांनी श्रवणयंत्राची मागणी केली होती. परंतु सदर योजनेंतर्गत शहरामध्येच असलेल्या सहयाद्री मल्टी स्पेशालिटी रूग्णालयात श्रवणयंत्रे उपलब्ध करून देण्यात आल्याने रूग्णांची गैरसोय झालेली नाही.

(२) होय.

(३) व (४) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आतापर्यंत उस्मानाबाद जिल्हा रूग्णालयामार्फत पात्र लाभार्थ्यांना ४५५ श्रवणयंत्राचे वाटप करण्यात आले आहे. तर शासकीय रूग्णालयामार्फत पात्र लाभार्थ्यांना २८७६ श्रवण-यंत्राचे वाटप करण्यात आले आहे.

---

## दौंड (जि.पुणे) येथील श्रेणीवर्धन केलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम करण्यासाठी निधी मिळणेबाबत

**(४८) १३२८०९ (११-१२-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटावरून १०० खाटा मध्ये श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयासाठी आवश्यक असणारे बांधकाम व अतिरिक्त पदस्थापना देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयाचे बांधकाम व अतिरिक्त पदस्थापना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ३३१/आरोग्य ३ अ दि. १२ ऑक्टोबर, २०१८ अन्वेय दौंड (पुणे) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटावरुन १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) खरे आहे.

श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाच्या दृष्टीने अंदाजपत्रक व आराखडे सादर करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले असून त्याबाबत वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय दौंड यांचे कडून पाठपुरावा सुरु आहे.

श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम ७५ टक्के पेक्षा अधिक पुर्ण झाल्यानंतर आकृतीबंधानुसार पदनिर्मिती व साहित्य सामुग्री बाबत कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील पाझर तलावांची झालेली दुरावस्था

**(४९) १३२८७६ (०५-१२-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जानोरी, सहस्त्रलिंग, जिन्सी, भिलानी, बोरखेडा खु. (ता.रावेर, जि.जळगाव) येथील पाझर तलाव नादुरुस्त झाल्याने या पाझर तलावामध्ये पाण्याचा साठा होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाझर तलावांची दुरुस्ती करणेबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, पाझर तलावांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) जानोरी, सहस्त्रलिंग, जिन्सी, भिलानी (बोरखेडा) ता. रावेर येथील पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामास जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर पाझर तलावांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रकीय रक्कम मोठी असल्याने त्यास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जळगाव यांनी प्रशासकीय मान्यता दिली नाही. सबब जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०१७-१८ च्या दरसुचीवर आधारित सुधारीत अंदाजपत्रकाबाबतची कार्यवाही सुरू आहे. अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिका-याची मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार जानोरी, सहस्त्रलिंग, जिन्सी, भिलानी (बोरखेडा) ता. रावेर येथील पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालय श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव

**(५०) १३३२८१ (१०-१२-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयाला जिल्हा रुग्णालयाचा दर्जा प्राप्त असून ग्रामीण व शहरी भागातून सदर रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णात वाढ झाल्याने सध्या अस्तीत्वात असलेल्या २०० खाटा अपू-या पडत असल्यामुळे सदर रुग्णालयास ३५० खाटांचा सुसज्य श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव शासनाने दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामासाठी अंदाजीत आराखडे मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव शासनास माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर दोन्ही प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही

संचालक आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.